# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 10/01/2022 (सोमवार)
(सकाळ)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 11 कि. मी. अंतरावरील मौजा एस्सार पेट्रोल पंपजवळ मांढळ ते पचखेडी रोड येथे दिनांक 08/01/2022 चे 19:00 वा. ते 19.05 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेश तारीखराव पाटील, वय 53 वर्ष, रा. गजानन राईस मील मागे मांढळ हे त्यांच्या एम.एच.–31/बीटी–75 क्रमांकाच्या बजाज डिस्कव्हर गाडी दुचाकीने गोठनगाव क-हांडला अभयारण्याचे गेटवर मित्राला पोहचवून परत येत असता एस्सार पेट्रोल पंपाजवळ मांढळ ते पचखेडी रोड वर मांढळ कडून पचखेडी चे दिशेने एक अज्ञात कार चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन वेगाने व हयगयीने चालवून फिर्यादीचा दुचाकीला धडक दिली. या अपघातात फिर्यादी हे गाडीवरून खाली पडल्याने त्यांचा उजव्या पायाला आणी डाव्या व उजव्या हाताला मार लागला व दुचाकीचेही नुकसान झाले. फिर्यादीला धडक दिल्यानंतरही कार चालकाने आपल्या ताब्यातील वाहन नियंत्रीत न करता दुसऱ्या दुचाकीलाही धडक दिली. तो इसम गाडी वरून खाली पडला व हालचाल करीत नव्हता थोड्या वेळाने पोलीसांची गाडी अपघाताचे ठिकाणी आली व फिर्यादीला उपचारासाठी पि.एच.सी मांढळ ला आणले व तेथून श्री हॉस्पीटल नागपूर येथे पत्नीने आणले. कारचालकाने धडक दिलेला दुसरा गाडी क्र एम.एच. 40/एजे/8048 चालक नामे– स्वप्नील उर्फ करण नंदीरा झाडे रा.गोठनगाव ता. कुही हा गंभीर जखमी होउन जागीच मरण पावला. फिर्यादी हे सुद्धा गंभीर जखमी झाले असल्याने स्वप्नील उर्फ नंदीरा झाडे याच्या मरणास कारणीभुत असलेल्या कार चालकाला व कारचे नंबर पाहू शकले नाही.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 134(अ), 177, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी नितेश डोर्लीकर हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत चक्रधर घाट मौदा कन्हान नदि येथे दिनांक 09/01/2022 चे 04.00 वा. ते 04.30 वा. सुमारास कुंडलीक धोंडू तांडेकर(मृतक), वय 70 वर्ष, रा. नाथनगर मौदा हा चक्रधर घाट मौदा कन्हान नदिचे पा्त्रात आंघोड करण्यास गेला असता खोल पाण्यात गेल्याने नदिचे पाण्यात बुडून मृताअवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लिलाधर कुंडलीक तांडेकर रा. नाथनगर मौदा यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बेले हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत शनि चौक काटोल येथे दिनांक 09/01/2022 चे 07.30 वा. सुमारास जर्नादन मारोतराव सावरकर (मृतक), वय 65 वर्ष रा. शनि चौक काटोल हा घराबाहेर अंगणात असलेल्या विहीर जवळ चुलीवर अंघोळ पाणी गरम करण्याकरिता चुल पेटवुन आंघोळ करिता चुलीवर पाण्याचा हंडा ठेवुन चुलीला लागुनच असलेल्या विहीवर जावुन बसला असता, विहीरीवर टाकलेल्या लोखंडी जाळीचा त्याला स्पर्श लागुन करंट लागल्याने त्याला विहीरीच्या बाजुला फेकल्या गेला. त्याला लगेच उचलुन ग्रामीण रूग्णालय काटोल येथे उपचाराकरिता नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनायक मारोतराव सावरकर वय 50 वर्ष रा. शनि चौक काटोल खुर्द यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा प्रभुदास दलाल मो नं. 9823970139 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर